लोकमत

# ‘पीएच.डी.’साठी करा ऑनलाईन अर्ज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील पीएच.डी. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. याअंतर्गत प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या (www.unishivaji.ac.in) संकेत-स्थळावर उपलब्ध झाले आहेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत २४ जुलै रोजी रात्री १२ पर्यंत आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील पीएच.डी. ॲडमिशन २०२२-२३ या विभागात अर्ज उपलब्ध आहेत. प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक आणि हॉल तिकीट उपलब्ध केले जाणार आहे, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.